दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET
Email : attalsanket2023@gmail.com
RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-३२४ ■ बुधवार, दि. २६ मार्च २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये

■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -324 ■ Wednesday, 26 March 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

## गुढीपाडव्यापासून व्यावसायिक गाड्यांवरील संदेश मराठीतूनच

### मंत्री प्रताप सरनाईकाचे परिवहन विभागाला निर्देश

मुंबई : मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यानंतर आता राज्यात मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार सर्वत्र झाला पाहिजे यासाठी राज्य सरकार पावले उचलत आहे. प्रत्येक शाळेत मराठी भाषा सक्तीची केली आहे. इंग्रजी माध्यमांच्या शाळेतही मराठी भाषा शिकवणे बंधनकारक असणार आहे. दरम्यान, आता वाहनांबाबत सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. राज्यातील व्यावसायिक वाहनांवर लिहिण्यात येणारे संदेश हे मराठीत असावेत, असे निर्देश राज्याच्या परिवहन मंत्र्यांनी परिवहन विभागाला दिले आहेत.

मराठी ही राज्याची अधिकृत राज्य भाषा आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. मराठी भाषेचे संवर्धन करणे ही सरकारची नैतिक जबाबदारी आहे. त्यासाठीच राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्रात नोंदणी असलेल्या व्यावसायिक वाहनांवर सामाजिक संदेश, जाहिरात किंवा जनजागृती करणारी वाक्ये लिहिलेली असतात. बहुतांशवेळा ही वाक्ये इंग्लिश हिंदीमध्येही असतात. त्यामुळे मराठी भाषेच्या प्रचार आणि प्रसारावर बंधने येतात. पण आता यापुढे अशी वाक्ये मराठी भाषेतच लिहावी. यामुळे राज्यातल्या जनतेला अधिक उपयुक्त माहिती मिळेल आणि भाषेचाही प्रचार-प्रसार होईल असं मंत्री प्रताप सरनाईक यांनी म्हटले आहे.

व्यावसायिक वाहनांमध्ये ट्रॅक्टर, ट्रक किंवा व्यवसायाच्या उद्देशाने खरेदी केलेल्या वाहनांचा समावेश आहे. परिवहन खात्याच्या कार्यालयांमध्ये असणाऱ्या वाहनांवरही मराठीत संदेश लिहिणे बंधनकारक असणार आहे. येत्या गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर या निर्णयाची अंमलबजावणी केली जाणार आहे. राज्यात नोंदणी असलेल्या सर्व व्यावसायिक वाहनांवर असणारे सामाजिक संदेश हे मराठी भाषेत लिहावे. याबाबत मंत्री प्रताप सरनाईक यांनी परिवहन आयुक्तांना निर्देश दिले आहेत.

## मराठ्यांच्या शौर्याचे प्रतीक म्हणून पानिपत येथे स्मारक उभारणार

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती

मुंबई : मराठ्यांच्या शौर्याचे प्रतीक म्हणून पानिपत येथील कालाआंब परिसरात भव्य स्मारक उभारण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी विधानसभेत दिली. पानिपत ही आमच्या पराभवाची नाही तर मराठ्यांच्या शौर्याची लढाई आहे. पानिपतच्या लढाईत त्या दिवशी पराभव झाल्याचे शल्य मनात असेल पण तिथे आमचा पराभव झाला असे आम्ही मानत नाही. पानिपतमधून उर्जा घेऊनच महादजी शिंदेंनी नंतर दिल्ली जिंकली, छत्रपती शिवरायांचा भगवा देशात लावला. या देशाकरिता मराठे लढले म्हणूनच आमच्या शौर्याचे स्मारक तेथे तयार झाले पाहिजे, असेही फडणवीस म्हणाले.

देवेंद्र फडणवीस यांनी पानिपत येथे मराठयांच्या शौर्याचे प्रतीक म्हणून स्मारक उभारण्याची घोषणा केली होती. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी फडणवीस यांना पानिपत येथील स्मारकाची आठवण करून दिली. पानिपतचे कुठलेही स्मारक हे पराभवाची आठवण करून देणारे आहे. पानिपतात मराठे जिंकले नाही तर त्यांचा दारूण पराभव झाला, हा इतिहास पुसता येणार नाही. त्यावर देवेंद्र फडणवीस यांनी स्मारक उभारणीचा पुनरुच्चार केला.

पानिपतची लढाई ही आमच्या शौर्याची लढाई आहे. मराठ्यांनी अटकेपार झेंडे लावले होते. त्याचा बदला घेण्यासाठी पानिपतची लढाई झाली. ती लढाई मराठे जिंकलेच होते. या लढाईत मराठ्यांना कोणाचीच मदत झाली नाही, तरीही मराठे भारतासाठी लढले. पानिपतात गोलाची लढाई होती. पण दुर्देवाने गोल फुटला. तिथे पारडे अब्दालीच्या बाजूने झुकले. पण ही लढाई इथे संपत नाही. त्यानंतर महादजी शिंदेंनी १० वर्षांनी दिल्ली पुन्हा जिंकली आणि एकछत्री अंमल आणला.

अब्दालीला मराठ्यांनी इतके उध्वस्त केले होते की तो या देशात थांबलाच नाही, तो गावी परत गेला. म्हणून पानिपतच्या लढाईबाबत काही शल्य असेल पण आमचा पराभव झाला असे मी मानत नाही. पानिपतमधून ऊर्जा घेऊन महादजी शिंदेंनी छत्रपती शिवरायांचा भगवा देशात लावला. या देशाकरिता मराठे लढले. म्हणूनच आमच्या शौर्याचे स्मारक तयार झालेच पाहिजे, असे फडणवीस म्हणाले.

## राज्यात रोज २२ बलात्कार, ४५ विनयभंग; अंबादास दानवेंकडून गृह विभागाच्या कारभारावर टीका

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

राज्यात अनागोदीची स्थिती आहे. सरकारमधील मंत्र्यांवर गंभीर आरोप आहेत. कायदा सुव्यवस्थेची स्थिती ढासळली आहे. राज्यात रोज २२ बलात्कार आणि ४५ विनयभंगाच्या घटना घडत आहेत. आरोपींवर कारवाई होत नसल्यामुळे गुन्हेगारांवर पोलिसांचा धाक राहिला नाही, असा आरोप अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलताना विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला.

राज्याचा गुन्हे अहवाल दरवर्षी प्रसिद्ध केला जातो. पण, गत दोन वर्षांपासून गुन्हे अहवाल प्रसिद्ध करण्यात आला नाही. जाणीवपूर्क गुन्ह्यांची माहिती दडवली जात आहे. राज्यात २०२४ मध्ये ७ लाख ८२ हजार ९६० गुन्हे घडले आहेत. अमरावती परिक्षेत्रात दंगलीचे ५६४ गुन्हे घडले आहेत. नागपूर पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत २०८८ खूनाच्या घटना घडल्या आहेत. बलात्काराच्या घटना वाढल्या आहेत. छत्रपती संभाजीनगरमध्ये १६६, पुण्यात ५०६ नागपुरात २९७ बलात्काराचे गुन्हे घडले आहेत. २०२४ मध्ये एकूण ७,९८२ बलात्काराच्या आणि १६,२०० विनयंभगाच्या घटना घडल्या आहेत. म्हणजे रोज २२ बलात्कार आणि ४५ विनयभंगाच्या घटना घडत आहेत.

पोलिसांकडून आरोपींवर कारवाई होत नसल्यामुळे आरोपी मोकळे सुटले आहेत. आरोपींना पोलिसांची भीती राहिली नाही. महिलांसाठी २०२२ मध्ये 'मिशन शक्ती' अभियान राबविले गेले, त्यासाठी प्रस्तावित रकमेच्या फक्त २२ टक्के रक्कम खर्च झाली, असा आरोपही दानवे यांनी केला. राज्यातील कारागृहांमध्ये कैदी कोंबून भरले आहेत. कारागृहांतील बंदींची क्षमती २७ हजार असताना, आजघडीला कारागृहात ४३ हजार कैदी आहेत. क्षमतेपेक्षा १६ हजार कैदी जास्त असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले.

### ठेकेदाराला आगाऊ दिलेल्या रकमेची चौकशी; आवास योजनेत अनियमितता, सरकारचे कारवाईचे आश्वासन

'जो भाजपच्या विरोधात त्याच्यावर गुन्हे' मानवाधिकार आणि शवविच्छेदन अहवालामध्ये पोलिसांच्या मारहाणीत सोमनाथ सूर्यवंशीचा मृत्यू झाला, असे स्पष्टपणे म्हटले आहे. तरीही, सूर्यवंशीला मारहाण करणाऱ्यांवर कारवाई होत नाही. गुन्हा दाखल झाल्यावर तत्काळ मंत्र्याच्या मुलाचे विमान वळिवले जाते. पण, संतोष देशमुख प्रकरणातील एक आरोपी अद्याप फरार आहे, असे का होते. भोकरदनमध्ये एका तरुणाला चटके दिले गेले. पोलिसांना पुरावे दिले तरी आरोपी सापडत नाही. मात्र, या प्रकरणी त्या ठिकाणी नसलेल्या शिवसेनेच्या नवनाथ दौड या पदाधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल केले गेले आहेत. जो भाजपच्या विरोधात जाईल, त्याच्यावर गुन्हे दाखल केले जात आहे, असा आरोपही दानवे यांनी केला.

## एमपीएससीकडून 'पीएसआय'चा निकाल जाहीरः अतिश मोरे राज्यात प्रथमः

पुणे : एमपीएससीने प्रसिद्धिपत्रकाद्वारे या बाबतची माहिती देण्यात आली. एमपीएससीने पीएसआय संवर्गातील ३७४ पदांसाठी ५ नोव्हेंबर २०२३ रोजी परीक्षा घेतली होती. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) घेण्यात आलेल्या महाराष्ट्र अराजपत्रित गट- ब सेवा मुख्य परीक्षेतील पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) संवर्गाची सर्वसाधारण गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली. त्यात अतिश मोरे यांनी सर्वाधिक गुणांसह राज्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे.

एमपीएससीने प्रसिद्धिपत्रकाद्वारे या बाबतची माहिती देण्यात आली. एमपीएससीने पीएसआय संवर्गातील ३७४ पदांसाठी ५ नोव्हेंबर २०२३ रोजी परीक्षा घेतली होती. उमेदवारांचे निकालाकडे लक्ष लागले होते. त्यानुसार एमपीएससीने सर्वसाधारण गुणवत्ता यादी संकेतस्थळावर जाहीर केली. सर्वसाधारण गुणवत्ता यादी उमेदवारांच्या अर्जामधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने तयार करण्यात आली आहे. अंतिम निकालापूर्वी पडताळणी केल्यानंतर काही उमेदवारांच्या शिफारशींमध्ये बदल होऊ शकतो. खेळाडू व अनाथ प्रवर्गातून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची प्रमाणपत्र प्राधिकृत अधिकाऱ्यांकडून पडताळणीच्या अधीन राहून त्यांचा प्रवर्गाचा दावा तात्पुरता ग्राह्य धरण्यात आला आहे. त्यानुसार सर्वसाधारण गुणवत्ता यादीमध्ये समावेश करण्यात आला आहे.

सर्वसाधारण गुणवत्ता यादी न्यायालयात दाखल विविध न्यायिक प्रकरणांमधील न्यायनिर्णयाच्या अधिन राहून जाहीर करण्यात येत आहे. उमेदवारांच्या प्रमाणपत्राची पडताळणी पूर्ण झाल्यानंतर खेळाडूव अनाथ प्रवर्गातील संवर्गाची तात्पुरती निवड जाहीर होईल. त्यानंतर या परीक्षेच्या भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्यायही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या प्रक्रियेनंतर अंतिम गुणवत्ता यादीच्या आधारे उमेदवारांची शिफारशी करण्यात येतील, अशी माहिती एमपीएससीकडून देण्यात आली आहे.

## रेल्वेतून नोटांची तस्करी, दोघांना अटक

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

केरळमधील पुनलुर स्थानकावरुन रेल्वे संरक्षण दलाच्या जवानांनी दोन जणांना अटक केली आहे. रेल्वेतून नोटांची तस्करी केल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली आहे. अटक केलेल्यांकडून नोटा जप्त करण्यात आल्या आहेत. जप्त केलेल्या नोटा खऱ्या आहेत की खोट्या याची तपासणी सुरू आहे. आरोपींकडून ५०० रुपयांच्या नोटांच्या स्वरुपात एकूण ४४ लाख रुपये जप्त करण्यात आले आहेत. पाकिस्तान आणि बांगलादेशमध्ये तयार केलेल्या बनावट भारतीय नोटा वेगवेगळ्या मार्गाने भारतात पाठवण्याचा प्रयत्न सुरू आहे. याआधी उत्तर प्रदेशमधील अलीगड येथे एसओजी आणि पोलिसांनी संयुक्त कारवाई करुन तीन जणांना अटक केली. अटक केलेल्यांकडून ५०० रुपयांच्या नोटांच्या स्वरुपात एकूण ७७ हजार रुपये जप्त करण्यात आले. या सर्व बनावट नोटा असल्याचे लक्षात आले. यामुळे केरळमध्ये अटक केलेले दोघे बनावट नोटा घेऊन जात होते की कोणाचा काळा पैसा सुरक्षित ठिकाणी नेण्यासाठी तस्करांची मदत घेतली जात होती, याचा तपास सुरू आहे.

## भारतावर १० वर्षात २५० अब्ज डॉलर्सने वाढले विदेशी कर्ज

### ८ लाख ३९ हजार कोटींवर गेले महाराष्ट्रावरील कर्ज

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

भारतात गेल्या १० वर्षात विदेशी कर्ज २५० अब्ज डॉलर्सने वाढले आहे. लोकसभेत विचारण्यात आलेल्या एका प्रश्नाचे उत्तर देताना केंद्रीय वित्त मंत्रालयामार्फत हे उत्तर देण्यात आले आहे. वित्त मंत्रालयाला एक प्रश्न विचारण्यात आला होता की, ३१ मार्च २०१४ रोजी भारतावर विदेशी कर्ज किती होते? ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत कर्ज किती वाढले आहे?

अर्थमंत्रालयाने मात्र सप्टेंबर २०२४ पर्यंतची आकडेवारी मांडली आहे. त्यानुसार देशावर ७११.८ अब्ज अमेरिकन डॉलर्सचे विदेशी कर्ज आहे. मार्च २०१४ मध्ये ४४६.२ अब्ज अमेरिकन डॉलर्स इतकं विदेशी कर्ज होते. म्हणजेच गेल्या १० वर्षात भारतावरील विदेशी कर्ज २६५ अब्ज डॉलर्सने वाढले आहे. वित्त मंत्रालयाने या उत्तरासोबत आणखी माहिती दिली. भारताने २०१३-१४ मध्ये विदेशी कर्जावर व्याज ११.२० अब्ज अमेरिकन डॉलर्स इतके दिले होते. २०२३-२४ मध्ये अंदाजे २७.१० अब्ज डॉलर्स इतके व्याज दिले आहे.

महाराष्ट्राचे अर्थमंत्री अजित पवार यांनी काही दिवसांपूर्वी राज्याचा अर्थसंकल्प मांडला. यामध्ये महाराष्ट्रावर किती कर्ज आहे याची माहिती दिली. महाराष्ट्रावरील कर्जाची रक्कम ९ लाख ३२ हजार कोटींवर जाईल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ साठीचा अर्थसंकल्प मांडण्यात आला, तेव्हा वर्तवण्यात आलेल्या अंदाजापेक्षा अधिक कर्ज महाराष्ट्रावर झाले आहे. महाराष्ट्रावरील कर्ज ८ लाख ३९ हजार कोटींवर गेले आहे. केंद्र आणि आरबीआयने राज्य सरकारांनी किती कर्ज काढावे, याबाबतचे नियम निश्चित केले आहेत. त्यानुसार राज्याच्या उत्पन्नाच्या एकूण २५ टक्क्यांपर्यंत कर्ज काढता येते.

## भाजपाची मुस्लिमांसाठी 'सौगत-ए-मोदी' मोहिम ईदनिमित्त ३२ लाख मुस्लिमांना विशेष किट वाटण्याची तयारी

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

भाजपाने मुस्लिमांचा राजकीय पाठिंबा मिळिवण्यासाठी पुढाकार घेतला आहे. ईदनिमित्त ३२ लाख मुस्लिमांना विशेष किट वाटण्याची तयारी केली आहे. पक्षाने या मोहिमेला सौगत-ए-मोदी असे नाव दिले आहे. रमजान महिन्यात मुस्लिमांमध्ये आपला प्रभाव वाढवण्यासाठी भाजपा एक विशेष मोहीम सुरू करणार आहे. याअंतर्गत, भाजपाचा अल्पसंख्याक मोर्चा 'सौगात-ए-मोदी' मोहीम सुरू करणार आहे. यामध्ये ३२ लाख गरीब मुस्लिमांना ईदची भेट देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

भाजपा अध्यक्ष जेपी नड्डा यांच्या नेतृत्वाखाली मंगळवारी दिल्लीतील निजामुद्दीन येथून हा कार्यक्रम सुरू होणार आहे. गरीब मुस्लिमांनाही ईदचा आनंद कोणत्याही अडचणीशिवाय साजरा करता यावा आणि सामायिक करता यावा यासाठी हा कार्यक्रम सुरू करण्यात येत आहे. सौगात-ए-मोदी मोहिम अंतर्गत देण्यात येणाऱ्या किटमध्ये कपड्यांसह शेवया, खजूर आणि फळे यांसारखे खाद्यपदार्थ असतील.

कपड्यांबद्दल बोलायचे झाले तर, महिलांच्या किटमध्ये सूट असेल आणि पुरुषांच्या किटमध्ये कुर्ता-पायजमा असेल. एका किटची किंमत




५००-६०० रुपये असेल. या मोहिमेअंतर्गत, भाजपा अल्पसंख्याक आघाडीचे ३२ हजार कार्यकर्ते देशभरातील मशिदींमधून गरजूंना हे किट वाटतील.या संदर्भात, भाजपा अल्पसंख्याक मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष जमाल सिद्दीकी यांनी मोहिमेची सविस्तर माहिती शेअर करताना सांगितले की, ईद, गुड फ्रायडे, ईस्टर, नौरोज आणि हिंदू नववर्षाच्या निमित्ताने या माध्यमातून गरजूंना मदत करण्याचा प्रयत्न केला जात आहे. एवढेच नाही तर जिल्हा पातळीवर ईद मिलन कार्यक्रमही आयोजित केला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

### मुस्लिम धर्मियांचा पाठिंबा मिळवण्याचे भाजपाचे मिशन

अल्पसंख्याक आघाडीचे राष्ट्रीय मीडिया प्रभारी यासिर जिलानी म्हणाले की, या माध्यमातून भाजपा मुस्लिम समुदायात कल्याणकारी कार्यक्रमांना प्रोत्साहन देऊ इच्छित आहे. भाजपा आणि एनडीएला राजकीय पाठिंबा मिळवू इच्छित आहे. हा कार्यक्रम महत्त्वाचा आहे कारण तो रमजान आणि ईद लक्षात घेऊन सुरू केला जात आहे. यावरून आता असे दिसून येते की मुस्लिमांचा राजकीय पाठिंबा मिळिवण्यासाठी भाजपाने जोरदार तयारी सुरू केली आहे. ओबीसी आणि मराठा समाजानंतर आता भाजपाचे मिशन मुस्लिम धर्मियांचा पाठिंबा मिळवण्याकडे आहे. यामुळे आता ईदच्या पार्श्वभूमिवर हा मोठा निर्णय घेण्यात आला आहे.

## झळा या लागल्या जीवा...

ऋतुबदल ही नैसर्गिक घटना असली तरी येणारा ऋतू कोणते अक्रीत घडवेल, या विचाराने धास्ती वाढण्याजोगी परिस्थिती बघायला मिळते. प्रत्येक ऋतूमध्ये येणारे संकट गहिरे होत असल्यामुळे पावसाळ्यात पावसामुळे होणाऱ्या हानीची, हाडे गोठवणाऱ्या थंडीमुळे सोसाव्या लागणाऱ्या त्रासाची, उन्हामुळे होरपळून जाण्याची चिंता हा ऋतुबदलाच्या काळातील अनिवार्य भाग ठरतो आहे. तापणाऱ्या उन्हाने यंदाचा उन्हाळा सामान्य नसल्याची सूचनाच दिली आहे. मार्च अखेरपर्यंतच अनेक भागांमध्ये उन्हे तापू लागली असून तापमानाने ४० अंशाचा टप्पा ओलांडण्यास सुरूवात केली आहे. त्यामुळेच पुढचे तीन महिने आपली किती होरपळ होईल, हे सांगता येणार नाही. पाणवठे कोरडे पडणे, जनावरांच्या पाणी, चाऱ्याचा प्रश्न, उष्माघातामुळे होणारे मृत्यू, भाजीपाल्याचा अभाव, कडाडणाऱ्या किमती हे आणि यासारखे नानाविध विषय वाढत्या उष्म्याशी संलग्न असल्यामुळे ही दाहकता एकांगी राहात नाही. त्याची धग वा चटके सर्वांगाने आणि सर्वार्थाने जाणवतात. म्हणूनच या वाढत्या दाहामागील कारणांची दखल घेणे गरजेचे ठरते. तापमान वाढत असल्यामुळे लोकांना असह्य उष्णतेचा अनुभव मिळू लागला आहे. तापमानाची पातळी अल्पावधीतच उच्चतम स्तरावर पोहोचण्याची शंका तज्ज्ञांकडून व्यक्त होत असल्यामुळे अनेक ठिकाणी उष्णतेचा कहर बघायला मिळणार हे निश्चित आहे. या तापमानवाढीला अनेक घटक कारणीभूत आहेत. सध्या चर्चेत असणारे जागतिक तापमानवाढ हे प्रमुख कारण म्हणावे लागेल. सध्या नानाविध कारणांमुळे सरासरी तापमानवाढ अनुभवाला येत आहे. यामध्ये सर्वाधिक योगदान आहे ते मानवी हस्तक्षेप, त्याच्या व्यवहाराचे. आताच्या तंत्र-यंत्रयुक्त जगात मानवाकडून होणारे प्रदूषण, कार्बन डायऑक्साइडचे उत्सर्जन प्रचंड प्रमाणात वाढले आहे. यामुळे हवामानात बदल होऊन सामान्यत: गारठा असणाऱ्या काही भागांतेखील उष्णता निर्माण होऊ लागली आहे. त्यामुळेच आता भर उन्हाळ्यात थंड हवेसाठी ओळखली जाणारी ठिकाणे तापताना दिसतात. कार्बन डायऑक्साइड हा मोठा ग्रीनहाऊस गॅस आहे. याच्या वाढत्या प्रमाणामुळे उष्णता पृथ्वीच्या पृष्ठभागावर कायम साठून राहून प्रखर सूर्यप्रकाशाची साथ मिळताच उष्णतेची तीव्रता वाढते. परिणामस्वरुप २१ व्या शतकात १.५ डिग्री सेल्सिअस तापमानाची वाढ झाली आहे. या वाढीमुळे पाण्याचे वेगाने बाष्पीभवन, पाण्याचे प्रमाण कमी होणे हे परिणाम दिसत असून तीव्र उन्हाळा अनुभवायला मिळत आहे. वनीकरणाची कमतरता हादेखील या समस्येशी संबंधित एक महत्त्वाचा घटक आहे. कारण वनस्पती पृथ्वीवर एक प्रकारे कूलिंग एजंट म्हणून काम करतात. झाडे आणि वनस्पती वातावरणातील कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात आणि ओलावा निर्माण करतात. यामुळे तापमान नियंत्रित राहते. तथापि, मानवी हस्तक्षेपामुळे जंगलांची तोड सुरू आहे. विशेषत: भारतात वृक्षतोड अधिक तर वनीकरणाचे प्रमाण गरजेपेक्षा अत्यंत कमी आहे. तापमानात वाढ होण्यामागे हेदेखील एक महत्त्वपूर्ण कारण आहे. पाणी संकलनाचे प्रमाण कमी झाल्यामुळे यंदा वातावरण अधिक उष्ण होताना दिसते आहे. ही निश्चितच धोक्याची घंटा म्हणायला हवी. गेल्या काही वर्षांत शहरीकरणाचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळेच इमारती, रस्ते, कारखान्यांच्या कचऱ्यामुळेही अधिक उष्णता निर्माण होते. शहरी भागांमध्ये 'हीट आयलंड'चा प्रभाव अधिक दिसतो. म्हणजेच शहरी भागातील तापमान ग्रामीण भागांच्या तुलनेत वाढलेले दिसते. कॉंक्रिट, स्टील, इतर बांधकाम साहित्य सूर्यप्रकाश शोषून अधिक उष्णता सोडते. त्याचप्रमाणे यांत्रिक उपकरणे आणि वाहनांच्या उत्सर्जनातून तयार होणारी उष्णताही प्रभाव दाखवते. यामुळेच शहरांमध्ये अधिक उष्णता साठवली जाते आणि या साठलेल्या उष्णतेमुळे आसपासचा परिसर जास्त तापतो. दुसरीकडे, पाण्याच्या साठवणुकीच्या समस्याही वाढत आहेत. अलीकडे पावसाच्या प्रमाणात सगळेच बदल अनुभवत आहोत. हवामानातील बदलामुळे पाऊस कमी होत आहे. पाऊस झाला तरी अचानक आणि प्रचंड प्रमाणात होतो. यालाच आपण अवकाळी म्हणतो. परिणामी, पाण्याच्या साठवणुकीचे आणि व्यवस्थापनाचे मोठे संकट उभे राहिले आहे. जलाशय, नदी आणि जलसाठ्यांमध्ये पाणी कमी होते आणि उन्हाचे चटके तीव्रतेने जाणवतात. कमी पाण्यामुळे वाढलेली उष्णता अधिक कष्टदायक बनते. वाढत्या उष्णतेमागे वायुप्रदूषण, ग्रीनहाऊस गॅसची कारणे ही आधुनिक काळाची देणगी म्हणावी लागेल. सध्या उद्योग आणि वाहतूक क्षेत्रामुळे वायुप्रदूषण अधिक होते आहे. यामुळे वातावरणातील ग्रीनहाऊस वायूंचे प्रमाणही वाढते. कार्बन डायऑक्साइड, मिथेन, नायट्रस ऑक्साइडसारख्या वायूंचे उत्सर्जन होते आहे. यामुळेही उष्णता साठून राहण्यास मदत होते आणि पृथ्वीवरील तापमान वाढते. याचा थेट परिणाम उष्णतेच्या वाढत्या प्रकोपाच्या रुपाने आपल्याला अनुभवायला मिळतो. हे लक्षात घेता वायुप्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी, जलवायू बदलावर कारवाई करण्यासाठी अनेक आंतरराष्ट्रीय करार झाले आहेत. 'पॅरिस करार' हे त्याचेच एक उत्तम उदाहरण आहे.

# 'ॐ नमो भगवते वासुदेवाय नमः'

**वारकरी संप्रदायामध्ये एकादशीचे व्रत अगदी भक्तीभावाने ठेवले जाते. या दिवशी भगवान विष्णुंची पूजा केली जाते. प्रत्येक चांद्रमासातील शुक्ल व कृष्ण पक्षातील ११व्या तिथीला एकादशी म्हटले जाते. या दिवशी विष्णुभक्त तसेच विठ्ठलभक्त उपवास करतात. एकादशीच्या दुसऱ्या दिवशी उपवास सोडला जातो. स्मार्त आणि भागवत एकादशी असे दोन भेद सांगितले आहे. ज्या पक्षात हे दोन भेद येतात. त्यावेळी पंचांगात पहिल्या दिवशी स्मार्त व दुसऱ्या दिवशी भागवत, असे लिहिलेले असते. अनेकदा एका पक्षात स्मार्त आणि भागवत, अशा एका पाठोपाठ दोन एकादशी असतात. यातील पहिल्या येणाऱ्या एकादशीला स्मार्त नाव असते. परंतु, भागवत एकादशीला नाव नसते. या दिवशी भगवान विष्णुंची पूजा कशा पद्धतीने करावी तसेच एकादशीचे नेमकं महत्त्व काय याविषयी जाणून घेऊयात:**




**( २६ मार्च: स्मार्त-भागवत एकादशी.)**

पूजाविधी- वारकरी संप्रदायामध्ये परंपरेने भागवत एकादशी साजरी केली जाते. या एकादशीच्या दिवशी भगवान विष्णुंची पूजा करून विष्णू भक्त दिवसभर उपवास करतात. भागवत एकादशी व्रत हे पूर्ण नियम, श्रद्धा व विश्वासाने केले जाते. या व्रताच्या प्रभावामुळे मोक्ष प्राप्ती होते. या व्रतामुळे अश्वमेध यज्ञ, घोर तपस्या, तीर्थ स्नान व दान या सर्वांपासून मिळणाऱ्या पुण्यापेक्षाही जास्त पुण्य मिळते, असे पौराणिक कथेत म्हटले आहे.

**महत्त्व-** वारकरी संप्रदायामध्ये एकादशीच्या व्रताला विशेष महत्त्व आहे. प्रत्येक मासात २ याप्रमाणे वर्षामध्ये २४ एकादशी येतात. यातील चैत्रापासून फाल्गुन मासातील शुक्ल पक्षात कामदा, मोहिनी, निर्जला, शयनी, पुत्रदा, परिवर्तिनी, पाशांकुशा, प्रबोधिनी, मोक्षदा, प्रजावर्धिनी, जयदा आणि आमलकी यांचा समावेश होतो. याशिवाय कृष्ण पक्षात पापमोचनी, वरुधिनी, अपरा, योगिनी, कामिका, अजा, इंदिरा, रमा, फलदा, सफला, षट्तिला व विजया या एकादशींचा समावेश होतो. पौराणिक कथेनुसार एकादशीच्या दिवशी सर्व पापे अन्नाचा आश्रय करून राहतात. म्हणून जो मनुष्य एकादशीच्या दिवशी अन्न भक्षण करतो त्याला ती पापे लागतात. म्हणून एकादशीला उपवास केला जातो. या दिवशी दान केल्यास भगवान विष्णू प्रसन्न होतात.

विष्णुभक्तांसाठी एकादशी हे व्रत म्हणजे एक पर्वणीच असते. त्यामुळे ते नेमाने सर्व एकादशी करतात. ज्यांना उपास करणे शक्य नसते, ते भगवान विष्णूची पूजा करतात. तसेच साधा सात्त्विक आहार घेतात. 'ॐ नमो भगवते वासुदेवाय नमः' या मंत्राचा जप करतात. अथवा विष्णुसहस्त्रनामाचे श्रवण-पठण करतात. मात्र जेव्हा एखादी तिथी विभागून येते आणि दिनदर्शिकेत दोन दिवसांवर एकाच तिथीचा दोनदा उल्लेख येतो तेव्हा काही भाविकांचा गोंधळ होतो. जसे की स्मार्त आणि भागवत एकादशी! मागील ९ डिसेंबर रोजी आलेल्या उत्पत्ती एकादशीला ही आणखी दोन नावे का? हा प्रश्न तुम्हालाही पडला असेल तर ही माहिती तुमच्यासाठी!

**उत्पत्ती एकादशी:** सर्व व्रतांमध्ये एकादशीच्या व्रताचे विशेष महत्त्व आहे. असे मानले जाते की या व्रताच्या प्रभावाने वर्तमानासह मागील जन्माची पापे नष्ट होतात. यासोबतच अनेक पिढ्यांतील पितरांना मोक्ष प्राप्त होतो. ज्यांना एकादशीचा उपवास सुरू करायचा आहे ते उत्पत्ती एकादशीपासून हे व्रत सुरु करू शकतात. या एकादशीच्या तिथीला देवीचा जन्म झाला म्हणून तिला उत्पन्ना तसेच उत्पत्ती एकादशी असेही म्हणतात. जाणून घेऊ एकादशीचे महत्त्व आणि कथा.

मग स्मार्त एकादशी म्हणजे काय? तर दशमी संपून एकादशी सुरू होताना त्या तिथीने सूर्योदय पाहिला नाही पण तो दिवस नव्या तिथीच्या नावे सुरू झाला असेल तर त्याला स्मार्त तसेच दर्श असा उल्लेख केला जातो. म्हणजे तिथी सुरू झाली पण तिथीशी संबंधित व्रत सूर्योदय पाहिलेल्या दिवशीच करायचे यासंबंधी ती सूचना असते. म्हणून ती स्मार्त एकादशी!

**भागवत एकादशी:** जी तिथी सूर्योदय पाहते ती तिथी आपल्याकडे ग्राह्य धरली जाते. म्हणजेच एकादशी तिथी आदल्या दिवशी सुरू झालेली असली तरी तिने जर दुसऱ्या दिवशीचा सूर्योदय पाहिला असेल तर ती तिथी पाळली जाते आणि दिनदर्शिकेवर देखील सूर्योदय पाहिलेल्या तिथीवर भागवत धर्माचे ध्वजचिन्ह दिसून येते. भागवत धर्म पाळणारे वारकरी बांधव त्यालाच भागवत एकादशी म्हणतात. वैष्णव उदय तिथी मानतात. स्मार्त वाले जिथून तिथी सुरू झाली ती तिथी मानतात आणि व्रत सुरु करतात. हा तो फरक.

स्मार्त म्हणजे जे लोक वेंदांवर, श्रुती स्मृती, पुराण यांना प्रमाण मानतात, ज्यांना वैदिक धर्माचं ज्ञान आहे, ते स्मार्त एकादशी पाळतात. थोडक्यात ऋषी, मुनी तसेच कर्मकांड करणारे योगी स्मार्त एकादशी करतात. तर वैष्णव म्हणजे जे विष्णू भक्त आहेत, संसारी आहेत, जे सूर्योदय पाहणारी तिथी ग्राह्य धरतात ते भागवत एकादशीचे व्रत करतात. म्हणून विष्णू भक्तांनी स्मार्त एकादशीला विष्णू पूजा करावी मात्र एकादशी व्रताचे पालन भागवत एकादशीला करावे, असे शास्त्र सांगते.



- संकलन व शब्दांकन -
**श्री एन. के. कुमार**
जी. से.नि.अध्यापक.
गडचिरोली मोबा-
७७७५०४१०८६.

भगवान विष्णूंना प्रसन्न करण्यासाठी भागवत एकादशी व्रत केले जाते. वारकरी संप्रदायामध्ये एकादशीचे व्रत अगदी भक्तीभावाने ठेवले जाते. या दिवशी भगवान विष्णुंची पूजा केली जाते. प्रत्येक चांद्रम ासातील शुक्ल व कृष्ण पक्षातील ११व्या तिथीला एकादशी म्हटले जाते. या दिवशी विष्णुभक्त तसेच विठ्ठलभक्त उपवास करतात. एकादशीच्या दुसऱ्या दिवशी उपवास सोडला जातो. एकादशीच्या व्रताला विशेष महत्त्व आहे. प्रत्येक मासात २ याप्रमाणे वर्षामध्ये २४ एकादशी येतात.

यातील चैत्रापासून फाल्गुन मासातील शुक्ल पक्षात कामदा, मोहिनी, निर्जला, शयनी, पुत्रदा, परिवर्तिनी, पाशांकुशा, प्रबोधिनी, मोक्षदा, प्रजावर्धिनी, जयदा व आमलकी यांचा समावेश होतो. याशिवाय कृष्ण पक्षात पापमोचनी, वरुधिनी, अपरा, योगिनी, कामिका, अजा, इंदिरा, रमा, फलदा, सफला, षट्तिला व विजया या एकादशींचा समावेश होतो. पौराणिक कथेनुसार एकादशीच्या दिवशी सर्व पापे अन्नाचा आश्रय करून राहतात. म्हणून जो मनुष्य एकादशीच्या दिवशी अन्न भक्षण करतो त्याला ती पापे लागतात. म्हणून एकादशीला उपवास केला जातो. या दिवशी दान केल्यास भगवान विष्णू प्रसन्न होतात. अशी मान्यता आहे.

# अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा व्यक्तिगत स्वातंत्र्याप्रमाणेच लोकशाही मूल्यांवर आधारित मूलभूत मानवी अधिकार

**अभिव्यक्ती** स्वातंत्र्य हा व्यक्तिगत स्वातंत्र्याप्रमाणेच लोकशाही मूल्यांवर आधारित मूलभूत मानवी अधिकार. स्वतःस अभिव्यक्त करता येणे म्हणजेच अभिव्यक्ती. माध्यम कोणतेही असले तरी, अभिव्यक्ती स्वातंत्र्य या शब्दाने केवळ बोलण्याचेच नव्हे, तर माहिती किंवा कल्पना हवी असणे, मिळवणे आणि देणे यांचे स्वातंत्र्यही अभिप्रेत असते. मानवाधिकाराचे वैश्विक घोषणापत्र कलम १९ अनुसार प्रत्येकास मतस्वातंत्र्य व भाषणस्वातंत्र्य असण्याचा अधिकार आहे. या अधिकारात कोणतीही ढवळाढवळ न होता, ते मत बाळगण्याला स्वातंत्र्याचा अधिकार असतो. हे स्वातंत्र्य म्हणजे व्यक्त होण्याची मुक्तता असणे, अशी व्याख्या भारतीय राज्यघटनेच्या कलम १९ मध्ये करण्यात आली आहे. ही झाली कायद्याची चौकट; परंतु अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली हजारो लोकांच्या मतांवर निवडून येणाऱ्या लोकप्रतिनिधींची बदनामी केली, तर त्यांच्या समर्थकांच्या भावना दुखावून, कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला तर? हो, असे घडले ते स्टड अप कॉमेडियन कुणाल कामराच्या एका गाण्यामुळे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरील व्यंगात्मक गाण्यानंतर राजकीय वतुर्ळात वाद सुरू झाला.

याप्रकरणी शिवसैनिकांनी कुणाल कामराच्या खारमधील स्टुडिओची मोडतोड केली. महाराष्ट्राच्या विधिमंडळातदेखील त्याचे पडसाद उमटले. दोन्ही सभागृहाचे कामकाज स्थगित करण्याची वेळ आली. विधान परिषद सभागृह शांत करण्यासाठी कुणाल कामराची किंवा इतर कोणाचीही अशा प्रकारची कॉमेडी चालवून घेतली जाणार नाही, असा इशारा गृहराज्यमंत्री योगेश कदम यांना द्यावा लागला. मुंबई महापालिकेवर सुमारे २५ वर्षांपेक्षा अधिक काळ सत्ता ही मातोश्रीवरील ठाकरे कुटुंबाच्या ताब्यात होती. २०१७ साली महापालिका निवडणुकीच्या आधी मुंबईतील रस्त्यांच्या दुर्दशेबाबत रेडिओ जॉकीने गायलेले गाणे खूप गाजले होते. 'सोनू तुला बीएमसीवर भरवसा नाय काय:' असे ते गाणे होते. हे गाणे मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्यानंतर ठाकरेचा प्रचंड तीळपापड झाला होता. त्यावेळी त्या महिला रेडिओ जॉकीला दमदाटी करण्याचे प्रकार झाले. मात्र, आता तेच ठाकरे आता कुणाल कामराला खांद्यावर घेऊन नाचताना दिसत आहेत. कुणाल कामराच्या गाण्याचे शब्द त्याच्या राजकीय मालकाने लिहून दिल्यासारखे वाटतात. त्यामुळे शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसैनिकांनी तो स्टुडिओ फोडला आहे. तसे पाहिले, तर फोडाफोडीचा शिवसेनेचा इतिहास हा नवा नाही. तरीही उबाठा सेनेच्या नेत्यांना आता अभिव्यक्ति स्वातंत्र्य सुचते आहे, याचे आश्चर्य वाटते.

महाराष्ट्राच्या गृहमंत्र्यांच्या नावाने ही मंडळी आता कंठशोष करत आहेत. जणू हा कामरा त्यांचे बंद होत चाललेले राजकीय दुकान सुरू करण्यास मदत करेल असा उबाठाचा भाबडा आत्मविश्वास सांगत असावा. गेल्या अडीच वर्षांपूर्वी एकनाथ शिंदे यांच्यासोबतच्या आमदारांनी बंड केल्यानंतर त्यांच्यावर गद्दार, ५० खोके एकदम ओके, असे संबोधून सुद्धा महाराष्ट्राच्या जनतेने शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेच्या पदरात यश टाकले. ४० आमदारांनी बंड केले. मात्र, पुढील निवडणुकीत ५५ पेक्षा जास्त आमदार स्वतच्या ताकदीवर निवडून आणण्याची धमक एकनाथ शिंदे यांनी ठेवली, हे अख्ख्या महाराष्ट्राने पाहिले. त्यामुळे एखाद्या कलाकाराला सुपारी देऊन त्याच्याकडून विडंबन करून घेण्याचा प्रकार उबाठा सेनेकडून केला गेला असावा. त्यामुळे विधिमंडळात कामराच्या मागचा बोलविता धनी कोण आहे? याची चौकशी करण्याची मागणी सत्ताधारी पक्षांकडून करण्यात आली, त्यामागचा हेतू स्पष्ट आहे.

कुणाल कामरा सध्या महाराष्ट्राबाहेर आहे. मुंबई पोलिसांनी त्याला समन्स पाठवून चौकशीला हजर राहण्याचे सांगितले आहे. तरीही, तो आपण माफी मागणार नाही, या मतावर ठाम आहे. संविधानाची प्रत हातात घेऊन कामराने अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा आपला अधिकार असल्याचा दावा केला आहे. त्यामुळे ही त्याची मस्ती की, प्रसिद्धीचा स्टंट म्हणायचा, हे लवकरच कळेल. त्याचे कारण, सतत प्रकाशझोतात राहण्यासाठी अनेक जण नकारात्मक प्रसिद्धीचा मार्ग अवलंबतात. 'जो बदनाम होता है, उसका ही नाम होता है' असा हिंदी चित्रपटातील एक फेमस डायलॉग आहे. याच डायलॉगप्रमाणे कामराला प्रसिद्धी मिळिवण्यासाठी महाराष्ट्रात लोकप्रिय मुख्यमंत्री म्हणून काम केलेल्या एकनाथ शिंदे यांच्यावर विडबंनात्मक गाणे म्हणावे लागले असावे. केवळ एकनाथ शिंदे नव्हे, तर पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांच्यावरही त्याने यापूर्वी विडंबनात्मक गाणी तयार केली आहेत. अर्बन नक्षलवाद म्हणजे काय असतो, तर विशिष्ट विचारसरणीची मंडळी हिंदुत्ववादी विचारांना सत्तेतून खेचण्यासाठी सध्या उतावीळ झालेली आहेत. त्यात कामरा यांच्यासारखे अनेक चेहरे लपलेले असू शकतात.

आता मविआचे सरकार गेल्यापासून तोल ढासळलेल्या उबाठा सेनेची अवस्था दयनीय झाली आहे. उद्धव ठाकरेना आपले मुख्यमंत्रीपद गेल्याची सल जात नाही, आदित्यना मंत्रीपद आणि इतर नेत्यांना सत्ता गेल्याचे दुख: विसरता येत नाही. त्यातून पक्ष फुटल्यापासून एकनाथ शिंदे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा पाणउतारा करण्याचा कार्यक्रम आजही जारी आहे.

आधी आमदार, खासदार साथ सोडून गेले. आता नगरसेवक, शाखाप्रमुखांसह हजारो शिवसैनिक साथ सोडून जात असल्याने कामरासारख्या कलाकाराच्या मागे राहून एकनाथ शिंदे यांच्या बदनामीचा प्रयत्न करण्याचे राजकारण ठाकरे कडून दिसते. अभिव्यक्ती स्वातंत्र्य प्रत्येकाला घटनेने दिलेला अधिकार आहे; परंतु याचा अर्थ तुम्हाला एखाद्या नेत्याबद्दल किंवा संवैधानिक पदावरील व्यक्तीबद्दल टिंगल टवाळी करण्याचे स्वातंत्र्य मिळत नाही, याचे भान प्रत्येक कलाकारांनी ठेवायला हवे.

# सीईटी परीक्षेत घोटाळा प्रकरणी चौघे अटकेत

मुंबई : राज्यात सीईटी परीक्षेत मोठा घोटाळा उघडकीस आला असून एका पेपरमध्ये टक्केवारी वाढवून देण्यासाठी तब्बल २२ लाख रुपयांचा आर्थिक व्यवहार झाल्याचे समोर आले आहे.याप्रकरणी चार जणांना अटक करण्यात आली असून, गुन्हेगार उत्तर प्रदेश आणि बिहारसारख्या परराज्यातील असल्याची धक्कादायक माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधान परिषदेत दिली.

सीईटी कक्षातर्फे एमबीए, एमएमएस आणि अभियांत्रिकीसह विविध व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) घेण्यात आली होती. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी इच्छुक उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागवण्यात आले होते. दरम्यान, दोन विद्यार्थ्यांनी स्पॅम कॉलद्वारे मार्क वाढवून देण्याचे आमिष दाखवण्यात आल्याची तक्रार दिली. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने तत्काळ समिती नेमून चौकशीचे आदेश दिले.

चौकशी अहवालात आर्थिक व्यवहाराचे पुरावे समोर आले असून या रॅकेटचा फैलाव देशभरात असल्याचे स्पष्ट असल्याचे मंत्री पाटील यांनी सांगितले. एका पेपरमध्ये टक्केवारी वाढवून देण्यासाठी प्रत्येकी २२ लाख रुपये घेण्यात आल्याचे उघड झाले आहे. याप्रकरणी आतापर्यंत चार आरोपींविरोधात गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे. या रॅकेटचा अधिक तपास सुरू असून प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचेही पाटील यांनी सांगितले

# मारवाडी समाजाचे महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत आणि विकासात मोठे योगदान - मुख्यमंत्री फडणवीस

## राजस्थान ग्लोबल फोरमच्यावतीने सिक्कीमचे राज्यपाल ओमप्रकाश माथूर यांचा नागरी सत्कार



**मुंबई**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

राजस्थान राज्यातील मारवाडी समाज महाराष्ट्रात अतिशय मेहनतीने उभा राहिलेला आहे. हा समाज महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत आणि विकासात मोठे योगदान देत आहे. जन्मभूमी सोडून त्यांनी कर्मभूमीत केलेले कार्य कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

बिर्ला मातोश्री सभागृह येथे राजस्थान ग्लोबल फोरम च्यावतीने सिक्कीमचे राज्यपाल ओमप्रकाश माथुर यांच्या नागरी सत्कार कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.

यावेळी माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, आमदार अभिमन्यू पवार, माजी आमदार राज पुरोहित, संजय उपाध्यय, विजय दर्डा, अभिनेते आणि कवी शैलेश लोढा, राजस्थान ग्लोबल फोरमचे राकेश मेहता, मोतीलाल ओसवाल, दिलीप महेश्वरी आदि मान्यवर उपस्थित होते.

राजस्थान ग्लोबल फोरम हे विविध सामाजिक उपक्रमांद्वारे उत्तम कार्य करत आहे. मुंबई आणि महाराष्ट्रात राहणाऱ्या राजस्थानी समुदायाचा विकासात मोठा वाटा आहे.

सिक्कीमचे राज्यपाल ओम प्रकाश माथूर हे राष्ट्र निर्माण कार्यात सहभागी असणारे तसेच राजकीय, सामाजिक क्षेत्रात मोठा संपर्क असणारे संवेदनशील व्यक्तीमत्त्व आहे. त्याच्यातील अद्वितीय आत्म विश्वास हे त्यांच्या व्यक्तिम त्वाचे वैशिष्ट्य असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

सिक्कीमचे राज्यपाल ओम प्रकाश माथूर नागरी सत्कारास उतर देताना म्हणाले, तुम्हा सर्वांच्या मेहनतीमुळे जे काही साध्य झाले, ते मिळाले आहे. हाच खरा सन्मान आहे. माझ्या सार्वजनिक जीवनात जो माझा एकदा मित्र झाला, तो कायमचा मित्र राहिला आहे. कधीच कोणाशी संबंध तुटले नाहीत. सर्वांची मदत करता आली हाच माझ्यासाठी सर्वोत्तम सन्मान आहे. मला भाईसाहेब या नावाने ओळखले जाते याच्यासारखा आनंद कोठेही नाही, असे सांगून श्री.माथूर म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई आणि महाराष्ट्र राज्याच्या विकासासाठी केलेले कार्य अभिमानास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

# वाघूर प्रकल्पाअंतर्गत शेततळे: शाश्वत सिंचनाचा राज्यातला नवा अध्याय



**जळगाव** जिल्ह्यातील जामनेर तालुक्यात जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या प्रयत्नातून राज्यातील पहिल्या पथदर्शी प्रकल्पाची अंम लबजावणी करण्यात आली आहे. वाघूर उपसा जलसिंचन योजनेअंतर्गत २७ गावांमध्ये २०२० शेततळी बांधण्यात येणार असून, त्यात वाघूर धरणाचे पाणी साठवले जाणार आहे. हा प्रकल्प परिसरातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत लाभदायक ठरणार असून, शाश्वत सिंचन सुविधेसोबत भू-जल पातळी सुधारण्यास देखील मदत करेल.

प्रकल्पाची वैशिष्ट्ये आणि फायदे

**शाश्वत सिंचन व्यवस्था** – शेततळ्यांमुळे परिसरातील शेतकऱ्यांना बारमाही पाणी पुरवठा उपलब्ध होईल. यामुळे पारंपरिक तसेच आधुनिक सिंचन पद्धती (ठिबक आणि तुषार सिंचन) वापरणे शक्य होईल.

जलसंधारण आणि पाणीबचत- शेततळ्यातील पाणी ठिबक आणि तुषार सिंचनासाठी वापरल्यास पाण्याचा कार्यक्षम उपयोग होईल आणि जलसंधारणास चालना मिळेल.

**शेती उत्पादनात वाढ** – नियोजनबद्ध सिंचनामुळे शेतकरी वर्षभर विविध पिके घेऊ शकतील. परिणामी, उत्पादन आणि उत्पन्न दोन्ही वाढेल.

स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना – शेततळ्या मध्ये मत्स्य पालन केल्यास , शेतीपूरक जोडधंदा ऊपलब्धहोईल.व्यवसाय बळकट झाल्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल, आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही गती मिळेल.

**वाघूर उपसा जलसिंचन योजनेचा विस्तार** – वाघूर उपसा जलसिंचन योजना क्र. १ आणि २ सध्या कार्यान्वित असून, या योजनेतून १९,१३२ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. योजनेअंतर्गत गाडेगाव, जामनेर आणि गारखेडा या तीन शाखांमधून १०,१०० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. २७ गावांम ध्ये २,०२० शेततळे बांधण्याचे उद्दिष्ट असून, त्यापैकी २१० शेततळ्यांची कामे पूर्ण झाली आहेत. गाडेगाव शाखेतील गाडेगाव, नेरी बुद्रुक, नेरी दिगर, चिंचखेडा, करमाड व पळासखेडा येथे ७० शेततळ्यांमध्ये पाणी साठवण्यास सुरुवात झाली आहे. सध्या ९०% पाइपलाईनचे काम पूर्ण झाले असून, उर्वरित कामे लवकरच पूर्ण होणार आहेत. आतापर्यंत १,१८९ शेततळ्यांचे करारनामे पूर्ण झाले आहेत.त्यातील २१० शेततळ्यांची कामे पूर्ण झाली आहेत.

**सिंचन सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी प्रशासन कटिबद्ध**

प्रकल्पाच्या अंमलबजावणीला गती देण्यासाठी शासन देखील कटीबद्ध आहे.जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली जलसिंचन विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत समन्वय बैठक आयोजित करण्यात आली. या प्रकल्पाची गती वाढवण्यावर भर दिला जात आहे.

वाघूर उपसा सिंचन योजनेअंतर्गत शेतकरी संवाद बैठका विविध गावांम ध्ये घेण्यात आल्या.प्रांताधिकारी विनय गोसावी यांच्या उपस्थितीत शेतकऱ्यांशी संवाद साधण्यात आला. शेततळ्यांबाबत शंका-निरसन बैठक आयोजित करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. उर्वरित करारनामे तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले.

**जलसंधारणाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल** – गोंडखेल येथील शेततळे हा केवळ जलसंधारण प्रकल्प नसून, तो ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या भविष्याला दिशा देणारा महत्त्वाचा टप्पा आहे. या प्रकल्पामुळे शेतीसाठी आवश्यक जलसाठवण क्षमता वाढेल. भू-जल पातळी सुधारेल, आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल. जलसंधारण आणि आधुनिक सिंचनाच्या मदतीने जळगाव जिल्ह्यातील शेती अधिक समृद्ध होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.

**– जिल्हा माहिती कार्यालय, जळगाव**

# विविध मागण्यासाठी 'बीआरएसपी'चा कन्नड तहसील कार्यालयावर मोर्चा



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

गायरान जमीन वन जमिनीवरील अतिक्रमण धारकांचे नियम करून त्यांच्या नावे सातबारा करण्यात यावा या प्रमुख मागण्यासाठी बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचा नेतृत्वाखाली सोमवारी दिनांक २४ मार्च कन्नड तहसील कार्यालयवर मोर्चा काढण्यात आला कन्नड तालुक्यातील गायरान धारक व जमीन धारक निवासी अतिक्रमण धारक अनुसूचित जाती , जमाती तर्फे पिशोर नाका येथून कन्नड तहसील कार्यालयापर्यंत प्रदेश महासचिव अरविंद कांबळे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली व जिल्हाध्यक्ष विजय शिनगारे यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढण्यात आला. गायरान वन जमिनीवरील अतिक्रमण धारकांचे नियम, भुमीहीनाना जमीन वाटप, शासकीय गायरान जमीन वन जमिनीवर घरकुल योजना राबविण्या बाबत, शासकीय गायरान जमीन वन जमिनीवर होत असलेल्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना शासन निर्णय तत्काळ रद्द करण्या बाबत या विविध मागण्याचे निवेदन तहसीलदार विद्याचरण कडवटकर साहेब यांना देण्यात आले

यावेळी विश्वजीत बागुल तालुकाध्यक्ष, साहेबराव दाभाडे जिल्हा उपाध्यक्ष, निर्मल ताई पेटारे जिल्हा उपाध्यक्ष, भगवान ठोकळ तालुका उपाध्यक्ष, शरद थोरात तालुका म हासचिव, संजय धनेधर तालुका सचिव, तय्यब शहा मा सरपंच , सतीश जैस्वाल शहर अध्यक्ष मध्य, स्वप्निल बिरारे तालुका उपाध्यक्ष सोयगाव, साहेबराव गायकवाड तालुकाध्यक्ष का म आघाडी, बबन बोराडे, सुलोचना ताई जाधव, समाधान दांडगे, महेंद्र साळवे, बाळू नाथा साळवे, काशिनाथ जाधव, सागर जाधव, रवींद्र गायकवाड, भरत पवार, गोकुळ खुडे, राहुल पवार, दादासाहेब जाधव, सोमनाथ सोनवणे, भगवान देवरे, शोभाताई पंडित, जगदीश वैष्णव, ज्ञानेश्वर वाघ, गणेश पवार इ पदाधिकारी व मोठ्या संख्येने भूमिहीन गायरान धारक उपस्थित होते

# धर्मादाय सह आयुक्त कार्यालयाच्या सेवा ऑनलाईन

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

धर्मादाय सह आयुक्त कार्यालयाने सन २०२४ मध्ये एकूण ८२३ बदल अर्ज व इतर न्यायिक प्रकरणे निकाली काढली आहेत. प्रलंबित बदल अर्ज व इतर न्यायिक प्रकरणे जलदगतीने निकाली काढण्याचे काम सुरू आहे. या कार्यालयातून देणार येणाऱ्या सर्व सेवा सुविधा ऑनलाईन उपलब्ध असून याचा फायदा घेण्याचे आवाहन कार्यालयामार्फत करण्यात आले आहे. सन २०२४ मध्ये कार्यालयामध्ये ४६० नवीन संस्थांची नोंदणी केली आहे. ज्या संस्थांनी नोंदणीसाठी किंवा लेखापरीक्षणासाठी प्रस्ताव सादर केले आहेत, त्यांना कार्यालयाम ध्ये चौकशीसाठी येण्याची आवश्यकता नाही. संस्थेच्या नोंदणी प्रस्तावांची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे. नागरिक आणि संस्थांनी धर्मादाय कार्यालयाच्या संकेतस्थळावरील सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन धर्मादाय सह आयुक्त रा. स. पावसकर यांनी केले आहे.

# पँथर प्रणित विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जिल्हा उत्सव जयंती समिती जाहीर



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

आज रोजी संस्थापक अध्यक्ष लक्ष्मण दादा भुतकर यांच्या अध्यक्षतेखाली पँथर कार्यालयात बैठक घेण्यात आली.

२०२५ या वर्षाची डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती खालील प्रमाणे निवड करण्यात आली. पँथर प्रणित विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर १३४ वि जिल्हा उत्सव जयंती समिती.

संस्थापक अध्यक्ष लक्ष्मण दादा भुतकर , अध्यक्ष धम्मापाल दांडगे, उपाध्यक्ष दशरथ कांबळे, कैलास पवार , स्वागाध्यक्षपदी अनिल साठे , सचिव अमोल भुतकर , सहसचिव संजय सरोदे , कार्याध्यक्ष ऍड सिध्दार्थ गवई, कोषाध्यक्ष सतिश राऊत, प्रमूख सल्लागार शरीफ लाला, अहमद पठाण, संघटक प्रकाश पवार, सदस्य रामदास पगडे, योगेश जुमडे, उत्तम डोंगरे, दिलीप पवार, शेख मोहसीन, सय्यद हबीब, समाधान कस्तुरे.

# छत्रपती संभाजी महाराज यांचे जीवन व कार्य या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र संपन्न

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, देवगिरी महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर, इतिहास विभाग व प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण, इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आज 'छत्रपती संभाजी महाराज यांचे जीवन आणि कार्य' या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले होते. या चर्चासत्राच्या पहिल्या सत्रामध्ये प्रमुख वक्ते आणि इतिहासतज्ञ डॉ. श्रीमंत कोकाटे यांनी 'स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज' या विषयावर आपले विचार मांडले. सद्यस्थितीमधील बिघडलेल्या सामाजिक सलोख्याचे विवेचन करून छत्रपती संभाजी महाराजांच्या अष्टपैलू व्यक्तित्वावर व कार्यावर त्यांनी सविस्तर वस्तुनिष्ठपणे मांडणी केली. ते पुढे म्हणाले की औरंगजेब हा क्रूरच होता, परंतु संभाजी महाराजांचे शौर्य लक्षात राहण्यासाठी औरंगजेबाचा इतिहास आणि स्मृती राहणे तेवढेच महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन केले. देवगिरी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक तेजनकर यांनी अध्यक्षीय समारोप करताना संभाजी महाराजांच्या जीवन व कार्यावर आपले विचार व्यक्त केले. या चर्चासत्राचे प्रास्ताविक देवगिरी महाविद्यालयाची इतिहास विभाग प्रमुख डॉ. महेश रोटे यांनी केले. तर प्रतिष्ठान महाविद्यालय पैठण येथील इतिहास विभागप्रमुख डॉ. राजेश करपे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. या सत्राचे आभार डॉ. सुभाष सूर्यवंशी यांनी मानले तर सूत्रसंचालन डॉ. सुवर्णा पाटील यांनी केले.

या एकदिवशीय राष्ट्रीय चर्चासत्रामधील दुसऱ्या सत्रात विषय 'छत्रपती संभाजी राजे आणि परकीय संबंध' हा होता. या विषयावर बोलताना डॉ. जगदीश भेलोंडे यांनी छत्रपती संभाजी महाराजांना केवळ औरंगजेबाशीच लढा द्यावा लागला नाही तर तत्कालीन कालखंडामध्ये भारतामध्ये आपले आसन स्थिर करण्याच्या प्रयत्नात असलेल्या पोर्तुगीज, सिद्धी, अरब, फ्रेंच, इंग्रज, डच इत्यादी परकीय सत्तांशीही संघर्ष करावा लागला. या संघर्षामुळे छत्रपती संभाजी म हाराजांची शक्ती अनेक ठिकाणी विभागल्या गेली आणि याचाच फायदा घेऊन औरंगजेब त्यांना कैद करू शकला आणि संभाजी महाराजांना स्वराज्यासाठी आपले बलिदान दिले. प्रतिष्ठान महाविद्यालयाचे प्राचार्य शिवानंद सोनकांबळे सर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये छत्रपती संभाजी महाराजांचे इतर परकीय सत्तांशी असलेले संबंध यावर प्रकाश टाकला. या चर्चासत्राला उपप्राचार्य डॉ. गणेश मोहिते तसेच विविध महाविद्यालयातील प्राध्यापक, इतिहास अभ्यासक, संशोधक विद्यार्थी यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. या चर्चासत्रासाठी प्रा.उमेश नवल, प्रा. बाळासाहेब टेकाळे, प्रा. राजाराम जेवे आदींनी परिश्रम घेतले.

# विश्वगुरू म्हणवणारा भारत 'एआय'मध्ये कुठे आहे? राज्यसभेत 'आप'च्या राघव चड्ढांचा सवाल

नवी दिल्ली: भारताला २१ व्या शतकातील विश्वगुरू व्हायचे असेल तर, देशाला कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) क्षेत्राचे नेतृत्व करावे लागेल. पण, 'एआय'च्या क्षेत्रात भारत खूपच मागे पडलेला आहे. अमेरिकेकडे चॅट-जीपीटी, जेमिनी, ग्रोक यासारखी एआय प्रारूपे आहेत. चीनकडे डीपसिक, बायडूसारखी प्रारूपे आहेत. भारताकडे कोणते स्वदेशी 'एआय' प्रारूप आहे? अमेरिका, चीन या देशांनी पाच वर्षांपूर्वी 'एआय'च्या क्षेत्रात संशोधन आणि विकासाला सुरुवात केली, या तुलनेत भारत कुठे आहे, असा लक्षवेधी सवाल राज्यसभेत शून्य प्रहरामध्ये आम आदमी पक्षाचे राघव चड्ढा यांनी केला.

'एआय' क्षेत्रातील क्रांतीचे भारताने नेतृत्व केले पाहिजे पण, आता भारत परदेशी 'एआय' प्रारूपांवर अवलंबून असल्याचे दिसते. भारत 'एआय'चा निर्माता नव्हे तर ग्राहक बनला आहे. 'मेक एन इंडिया' नव्हे तर, 'मेक एआय इन इंडिया' असे घोषवाक्य असले पाहिजे. 'एआय' क्षेत्राच्या संशोधन व विकासासाठी अमेरिका ५०० अब्ज डॉलर तर चीन १३७ अब्ज डॉलरची गुंतवणूक करत आहे, त्या तुलनेत भारत केवळ १ अब्ज डॉलरची गुंतवणूक करणार आहे, असे चड्ढा म्हणाले. २०१० ते २०२२ या १२ वर्षांमध्ये जगभरातील एकूण एआय पेटंटसाठी दाखल करण्यात आलेल्या नोंदणी अर्जांपैकी ६० टक्के अमेरिकेने, २० टक्के चीनने आणि फक्त ०.५ टक्के भारताने दाखल केले होते. स्वदेशी 'एआय' निर्मितीमध्ये भारत मागे पडल्याचा मुद्दा अधोरेखित केला.

**विश्वगुरू तर भारतच!**

राज्यसभेतील सदस्यांच्या मुद्द्यावर सभापती जगदीप धनखड नेहमी मार्मिक टिप्पणी करतात. राघव चड्ढा यांच्या एआय क्षेत्रातील उणिवांच्या मुद्द्यावर धनखड यांनी हसत-हसत, 'विश्वगुरू तर भारतच होणार', असे मत व्यक्त केले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनीही चड्ढांचे मुद्दे अत्यंत लक्षपूर्वक ऐकले. चड्ढांचे बोलणे संपल्यानंतर पवारांनी लगेचच चड्ढांना बोलावले. सभागृहाच्या शेवटच्या रांगेतील आसनावर जाऊन पवार बसले. त्यांनी चड्ढांना तिथे बोलावून घेतले. त्यानंतर सुमारे चार-पाच मिनिटे पवार चड्ढांशी चर्चा करताना पाहायला मिळाले. चड्ढांच्या म्हणण्यातील मुद्द्यांचे पवार स्वत: टिपण काढताना दिसले.

# आयकर विवरण सुधारणा करण्यास ३१ मार्चपर्यंत मुदत

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

आयकर विवरणपत्रांमध्ये दि.१ एप्रिल २०२५ पासून, आर्थिक वर्षांच्या सहा वर्षांनंतर कोणत्याही सुधारणा स्वीकारल्या जाणार नाहीत. त्यामुळ२००७-०८ते २०१८-१९ या आर्थिक वर्षांतील कर विवरणपत्रांमध्ये सुधारणा करण्यासाठी दि.३१ मार्च पर्यंत अंतिम मुदत देण्यात आली आहे. वरिष्ठ कोषागार अधिकारी कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, अनेक करदात्यांनी त्यांच्या कर विवरणपत्रांमध्ये काही त्रुटी ठेवल्या आहेत. या त्रुटींमुळे आयकर विभागाच्या TRACES पोर्टलवर थकबाकीची मागणी दिसत आहे.या समस्येवर उपाय म्हणून, करदात्यांनी ढठअउएड पोर्टलवर सुधारणा विधाने दाखल करून त्यांच्या थकबाकीची मागणी शून्य करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. ज्या करदात्यांच्या कर विवरणपत्रांमध्ये काही त्रुटी आहेत, त्यांनी दि.३१ मार्च पूर्वी आवश्यक ती सुधारणा करावी,असे आवाहन सहाय्यक संचालक निवृत्तीवेतन विभागाच्या श्रीमती सुषमा बुरकुले यांनी केले आहे.

## मापात पाप केल्यास शिक्षा अटळ; वजन-मापे अचुकतेची पडताळणी करा

### उपनियंत्रक वैध मापन शास्त्र शिवहरी मुंडे यांचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

वैध मापन शास्त्र अधिनियम - २००९ अन्वये कोणत्याही प्रकारच्या वजने मापांमध्ये अचुकता असणे बंधनकारक आहे. अशाप्रकारे अप्रमाणित वजनमापे वापरुन व्यवहार करणे म्हणजे 'मापात पाप'. असे केल्यास शिक्षेची तरतूद कायद्यात आहे. तरी प्रत्येक दुकानदार, पेट्रोलपंप चालक तसेच अन्य सेवा देणाऱ्या पुरवठादारांनी आपल्याकडील वजन मापे, तोलन उपकरणे आदी तपासून त्याची अचुकता पडताळणी करुन घ्यावी असे आवाहन उपनियंत्रक वैध मापन शास्त्र शिवहरी मुंडे यांनी केले आहे.

भारताच्या संसदेने वैध मापन शास्त्र अधिनियम - २००९ अंमलात आहे. राज्याच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून वैध मापन शास्त्र अधिकाऱ्या मार्फत या अधिनियमाची व त्याखालील विविध नियमांची अंमलबजावणी केली जाते. वजन मापांची अचूक पडताळणी व आवेष्टीत वस्तू नियमांची अंमलबजावणी हे या अधिकाऱ्यांचे प्रमुख काम आहे.

मापात पाप केल्यास शिक्षेची तरतूद

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली कार्यरत असलेल्या वैधमापन शास्त्र यंत्रणेच्या निरीक्षक, सहायक नियंत्रक कार्यालयाकडून प्रथम पडताळणी तसेच त्यानंतर मुदतीत फेरपडताळणी व मुद्रांकन करुन न घेतलेली वजने मापे व्यवहारात किंवा संरक्षण यासाठी वापरणे हा वैध मापन शास्त्र अधिनियम २००९ चे कलम ३३ नुसार शिक्षापात्र अपराध आहे. फेरपडताळणी न करता वजन माप वापरणे हा महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अमल) नियम २०११ च्या नियम १२ नुसार अपराध असून नियम २३ खाली शिक्षापात्र अपराध आहे. यासाठी अनुक्रमे १० हजार व ५ हजार रुपये दंडाची शिक्षा होऊ शकते. तसेच अवैध वजन मापे जप्त केली जातात व न्यायालयात खटला दाखल केला जातो.

वजन मापांची पडताळणी ग्राहकांचा अधिकार

तोलन व माप उपकरणे ही वापरामूळे व वातावरणाच्या बदलत्या स्थितीमूळे त्यात दोष निर्माण होण्यासाठी शक्यता असते. त्यामुळे नियमाने ठरविल्यानुसार या यंत्राचे नियमानुसार नियमित कॅलिब्रेशन व व्हेरिफिकेशन करुन घेणे बंधनकारक आहे. वजन मापांची पडताळणी केल्यामुळे त्यांची अचुकता योग्य आहे किंवा कसे यांची तपासणी केली जाते. तसेच पडताळणी नंतर अचुकता कायम आहे किंवा कसे याची दररोज तपासणी तोलन उपकरण वापरणाऱ्या व्यक्तीने करणे आवश्यक आहे. जर त्यात दोष उत्पन्न झाला असेल तर तसे संबंधित अधिकाऱ्यांना कळिवले पाहिजे व ते अचूक करुन घेतले पाहिजेत. तोलन उपकरणाची अचुकता तपासण्याचा ग्राहकांना अधिकार आहे. त्यासाठी उपकरणाच्या क्षमतेच्या एक दशांश एवढी प्रमाणित वजने व्यापाऱ्याने ठेवणे बंधनकारक आहे. तसे न केल्यास तो दंडात्मक अपराध आहे. पेट्रोल पंपातून देण्यात येणार इंधन बरोबर मिळते का हे तपासून पाहणे हा ग्राहकाचा हक्क आहे व त्यासाठी उपरकणाच्या क्षमतेच्या एक दशांश एवढी प्रमाणित वजने व्यापाऱ्याने ठेवणे बंधनकारक आहे व तसे न केल्यास तो दंडात्मक अपराध आहे. पेट्रोल पंपातून देण्यात येणारे इंधन बरोबर मिळते का हे तपासून पाहणे हा ग्राहकाचा हक्क आहे व त्यासाठी प्रमाणित व अचुक असे पाच लिटरचे माप पंपावर ठेवणे बंधनकारक आहे. पेट्रोल पंपातून विक्री होणाऱ्या इंधनात साधारणपणे प्रत्येक पाच लिटरमागे २५ मिली एवढी त्रुटी कायद्याने ग्राह्य आहे.

अशी कराल वजनमापांची पडताळणी - वजन मापांच्या पडताळणीसाठी राज्य शासनाच्या maitre (मैत्री) पोर्टलवर अर्ज करण्याची सुविधा आहे. GRASX या शासकीय पोर्टलवर पडताळणीचे शुल्क भरता येते. जिल्ह्यात अनेक दुरुस्ती परवानाधारकांना परवाने देण्यात आलेले असून त्यांच्या मार्फतही दुरुस्ती करुन वजने मापे पडताळणी शुल्क भरता येते व पडताळणीसाठी वजने मापे सादर करता येतात. परवानाधारक उत्पादक, विक्रेते व दुरुस्तक यांचा तपशील vaidhmaan पोर्टलवर उपलब्ध आहे. परवानाधारकामार्फत पडताळणी करावयाची असल्यास शुल्क भरुन पडताळणी करेपर्यंत व प्रमाणपत्र तयार होईपर्यंत व्यापाऱ्यांनी पाठपुरावा करावा.

पडताळणी बाबत कोणतेही अडचण अथवा तक्रार असल्यास किंवा वजन मापात फसवणूक होत असल्यास इतर कोणत्याही बाबीसाठी रलश्रारींीरपसरलरवरवऽ ूरहे.ळप या मेलवर तक्रार पाठवावी किंवा शासनाच्या छउक हेल्पलाईनवर तक्रार पाठवावी किंवा ०२४०-२४८३८१८ या दुरध्वनीवर संपर्क साधवा,असे आवाहन उपनियंत्रक शिवहरी मुंढे यांनी केले आहे.

## विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनानिमित्ताने भडकल गेट येथे अभिवादन करण्याकरीता तात्पुरत्या स्वरुपाचे स्मारक उभारण्यात यावे

### कामगार संघर्ष संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद पवार जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाव्दारे मागणी

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक समस्त भारतीय नागरीक तसेच आंबेडकरवादी विचारांच्या नागरीकांसाठी अस्मितेचे प्रतिक आहे. सध्या भडकल गेट येथील स्मारकाचे नुतनीकरण व सुशोभीकरण कार्य अत्यंत संवगतीने सुरु असल्यामुळे नागरीकांमध्ये नाराजीचा सुर पसरलेला आहे. दरवर्षी १४ एप्रिल रोजी जयंती निमित्ताने मोठ्या संख्येने नागरीक या ठिकाणी बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी येत असतात. परंतु, या वर्षी स्मारकाचे काम अपूर्ण असल्याने पर्यायी अभिवादनाची व्यवस्था करण्यात आलेली नसल्याने मुळ स्मारकाच्या जवळच तात्पुरत्या स्वरुपात स्मारकाची व्यवस्था करणे गरजेचे आहे. कामगार संघर्ष संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद पवार यांनी निवेदनात म्हटले आहे.



कामगार संघर्ष संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद पवार जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाव्दारे मागणी. त्या मागण्या पुढील प्रमाणे -

१) तात्पुरत्या स्वरुपातील पुतळा १४ एप्रिलपर्यंत भडकल गेट परिसरात बाहेरच्या जागेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा तात्पुरते पूर्णाकृती स्मारक बसविण्यात यावे. प्रशासनाद्वारे शक्य नसल्यास तात्पुरते स्मारक बसविण्याची परवानगी देण्यात यावी.

२) सुशोभीकरण पर्यायी तात्पुरत्या पुतळ्याच्या सभोवतलाचे क्षेत्र यथोचित सुशोभीत करण्यात यावे,

३) वाहतूक नियोजन १४ एप्रिल रोजी होणाऱ्या मोठ्या गर्दीमुळे वाहतूकीचा बोजवारा उडू नये यासाठी वाहतूक दुसऱ्या मार्गाने वळिवण्यात यावी. पार्कींग व्यवस्था मुळ पुतळ्यापासून दूर ठेवण्यात यावी.


४) कार्यक्रमाचे आयोजन भडकल गेट परिसरात अभिवादन व अन्य संबंधित कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी योग्य नागरी सुविधा पुरविण्याचे व्यवस्था करण्यात यावी. (जसे की, ॲम्बुलेन्स, पिण्याचे पाणी, फिरते शौचालय, आदी) विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रती असलेल्या भावनांचा आदर राखण्यासाठी आणि नागरीकांच्या भावनांना सन्मान देण्यासाठी वरील सुचनांवर सकारात्मक कृती करावी, अशी मागणी कामगार संघर्ष संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद पवार यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाव्दारे केली आहे.


## शनि अमावस्येनिमीत्त पैठण येथे महामस्तक अभिषेक महोत्सवाचे भव्य आयोजन

### छत्रपती संभाजीनगरसह देशभरातून हजारो भक्त उपस्थित राहणार

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

श्री.शनिग्रह अरिष्ठ निवारक मुनिसुव्रतनाथ भगवान अतिशय क्षेत्र पैठण येथे मुलनायक भारतातील जैन धर्मियांचे शनि अरिष्ठ निवारक श्रध्दा स्थान मुनिसुव्रतनाथ भगवान येथे शनि अमावस्या निमीत्त महामस्तक अभिषेक महोत्सव दिनांक २९/०३/२०२५ शनिवार रोजी आयोजन करण्यात आले आहे. संपुर्ण कार्यकम हा अंतर्मना आचार्य प्रसन्नसागरजी महाराज यांच्या आर्शिवादाने संपन्न होत आहे. सकाळी ८.०० वाजता भगवान मुनिसुव्रतनाथ विधान यानंतर धर्मध्वजारोहन संपन्न होणार आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणुन तिर्थक्षेत्र कमिटीचे महामंत्री संतोष पेंढारी, तिर्थक्षेत्र कमिटीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष संजय पापडीवाल, राष्ट्रीय उपाध्यक्ष निलम अजमेरा, राष्ट्रीय उपाध्यक्ष मिहीर गांधी, तिर्थभक्त किशोर शहा बारामती, सुनिल कोठारी, मनोज जैन हैद्राबाद, अशोक जैन दिल्ली, राजेश मांगीलाल पहाडे हैद्राबाद, अरुणकुमार गंगवाल राजनांदगांव, दिनेशकुमार सतिश सुनिल संतोष सेठी परिवार संभाजीनगर, अनुजकुमार कैलासचंद लोहाडे उपस्थित राहणार आहे.





या प्रसंगी उपस्थित राहणा-या हजारो भाविकांना श्रीमती.शोभादेवी सुभाषचंद पाटणी डॉ.सचिन, सौ.सपना दिनेश वैशाली हार्दिक शुभ कामना पाटणी परिवार मालेगांव वाला यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी त्यागी भवनासाठी दान दिलेले डॉ.रमनलाल, डॉ.निखील, डॉ.स्वप्नील शिरूर कासार बीड,व भरतरावजी प्रभाकर धोंगडे रहाटगांव, श्रीमती.कुसुमबाई किशनलाल काला, कैलास विलास संदीप काला परिवार पैठण शहागड यांचा यावेळी क्षेत्राच्या वतीने सन्मान करण्यात येणार आहे.

तरी धर्मप्रेमींनी तिर्थभक्तांनी अभिषेकाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन अध्यक्ष महावीर बडजाते,महामंत्री विलास पहाडे,कोषाध्यक्ष विजय पापडीवाल,जयकुमार बाकलीवाल,प्रमोद कासलीवाल,मनोज काला,प्रकाश कासलीवाल, कैलास पाटणी, किशोर भाकरे, सुमीत गंगवाल, डॉ.संजय गंगवाल,डॉ.राजेंद्र काला, स्वदेश पांडे, अभिजीत काला, यांच्यासह विश्वस्थ मंडळाने दिली अशी माहिती महामंत्री विलास पहाडे यांनी दिली

या महोत्सवासाठी छत्रपती संभाजीनगर, हैद्राबाद, मुंबई, पुणे, नाशिक, जयपुर, राजस्थान, मालेगाव दिल्ली आदी ठिकाणाहुन हजारो भक्त उपस्थित राहणार आहे. हि शनि अमावस्या दिड वर्षानंतर आली असुन समाज बांधवानी दर्शनाचा लाभ घ्यावा. असे आवाहन क्षेत्रातर्फे करण्यात आले असल्याची माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली आहे.

## लामनगाव येथे शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या

**खुलताबाद (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

खुलताबाद -तालुक्यातील लामणगांव येथे बटाईने शेती करीत असलेले सजन हिरालाल राठोड वय ३२ वर्षे यांनी बाभळीच्या झाडाला दोर बांधून गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना सोमवारी (दि.२४) दुपारी घडली,सदरील घटनाची माहिती मिळताच खुलताबाद पोलिसांनी ग्रामीण रुग्णालयात आणल्यानंतर वैद्यकीय अधिकारी डॉ.गायसमुद्रे यांनी शव विच्छेदन केले मृतदेहाचा पंचनामा करून.शव विच्छेदन करून मृतदेह नातेवाईकाचे ताब्यात दिले. आत्महत्येचे कारण स्पष्ट होवु शकले नसुन,या प्रकरणी खुलताबाद पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## डेटा सेंटर, स्टार्टअप व इनोव्हेशन क्षेत्रात महाराष्ट्र देशात अव्वल- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### यू.एस.इंडिया बिझनेस कौन्सिलच्या कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांनी मांडले विकसित महाराष्ट्राचे चित्र

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असून डेटा सेंटर, स्टार्टअप, इनोव्हेशन व गुंतवणुकीमध्ये महाराष्ट्र देशाचे नेतृत्व करत आहे. तंत्रज्ञान, माहिती तंत्रज्ञान, फिनटेक या क्षेत्रातील गुंतवणूकदारांचे महाराष्ट्र हे आवडते गुंतवणुकीचे ठिकाण झाले आहे. नवी मुंबई परिसरात इनोव्हेशन सिटी उभारण्यात येत असून वसई, विरार, पालघर परिसरात चौथी मुंबई निर्माण होत आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



मुंबईतील हॉटेल ताजपॅलेस येथे आयोजित यु.एस. इंडिया बिझनेस कौन्सिल (यूएसआयबीसी) च्या ५० व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित विशेष परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी यूएसआयबीसीचे अध्यक्ष राजदूत अतुल केशप, यूएस कन्सुल जनरल माइक हंकी, यूएस चेंबरच्या अध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी सुझेन क्लार्क आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, अमेरिका व भारतातील उद्योग वाढीमध्ये यु.एस. इंडिया बिझनेस कौन्सिल (यूएसआयबीसी)चे मोठे योगदान आहे. दोन्ही देशातील उद्योगांमधील सहकार्यासाठी अर्थपूर्ण व औपचारिक भूमिका कौन्सिल पार पाडत आहे. भारत हा जगातील तिसऱ्या क्रमांकाचे गुंतवणुकीचे स्थान आहे. भारतातील अनेक उद्योजक अमेरिकेत गुंतवणूक करण्यास उत्सुक आहेत, तसेच अमेरिकेतीलही अनेक गुतंवणूकदार भारतात येण्यास उत्सुक आहेत. देशातील सर्वाधिक गुंतवणुकीमध्ये महाराष्ट्र हा अव्वल स्थानावर असून देशाच्या सकल उत्पन्नात महाराष्ट्राचा मोठा वाटा आहे. थेट परदेशी गुंतवणुकीमध्ये महाराष्ट्राने स्वतःचाच विक्रम मोडला असून परदेशी गुंतवणूकदारांचे हे आवडते ठिकाण झाले आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र हे स्टार्टअपची राजधानी म्हणून ओळखले जात आहे. स्टार्टअपमधील गुंतवणूक व स्टार्टअप कंपन्यांमध्येही महाराष्ट्र अव्वल असल्याचे एका अहवालात नमूद केले असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, आर्थिक, व्यापार, नाविन्यता यामधील गुंतवणुकीमुळे महाराष्ट्र हे उद्योग जगताचे आवडते ठिकाण झाले आहे. अटल सेतू व नवी मुंबई विमानतळामुळे त्या परिसराचा कायापालट होत असून नवी मुंबईत विशिष्ट संकल्पनेवर आधारित नाविन्यता शहरे उभारण्यात येत आहेत. नाविन्यता, शिक्षणाशी संबंधित इकोसिस्टीम तयार करण्यात येत आहे.

या परिसरात परदेशातील जागतिक क्रमवारीतील पहिल्या पन्नासमधील ५ विद्यापीठे येणार असून त्यातील तीन विद्यापीठे ही अमेरिकेतील आहेत. त्यामुळे नवी मुंबई हे एक एज्युसिटी म्हणून ओळखले जाईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

**डेटा सेंटरला पुरविणार हरित ऊर्जा** – महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात डेटा सेंटरमध्ये गुंतवणूक होत आहे. देशातील ६५ टक्के डेटा सेंटर येथे आहेत. त्यामुळे राज्याला आता डेटा सेंटरचे कॅपिटल म्हणूनही ओळखले जात आहे. या डेटा सेंटरला पुढील २०२३ पर्यंत हरित ऊर्जा पुरविण्यात येणार आहे. पालघरजवळ देशातील सर्वात मोठे वाढवण बंदर उभारण्यात येत आहे.

जेएनपीटीपेक्षाही तीन पट मोठे हे बंदर असून या बंदराला बुलेट ट्रेन, मल्टिमॉडेल कॉरिडॉरने जोडले जाणार आहे. तसेच महामुंबईतील तिसरे विमानतळही उभारण्यात येत आहे. पायाभूत सुविधा व गुंतवणुकीमुळे हा परिसर चौथी मुंबई म्हणून विकसित होत आहे, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

पूर्वी माओवाद्यांचा जिल्हा म्हणून ओळख असलेला गडचिरोली जिल्हा आता देशाचे स्टिल हब म्हणून ओळखला जाणार आहे. या परिसरात स्टिल उद्योगामध्ये सुमारे दोन लाख कोटींची गुंतवणूक होत आहे. पुणे हे उत्पादन उद्योगांचे शहर आहेच. त्याचबरोबर आता छत्रपती संभाजीनगरमधील दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉरमुळे हा परिसर ईलेक्ट्रिक वाहनांची राजधानी बनला आहे. त्यासाठीची संपूर्ण व्यवस्था या परिसरात तयार केली आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

वेव्ज परिषदेत सहभागी होण्याचे अमेरिकन गुंतवणुकदारांना आमंत्रण

जागतिक मनोरंजन परिषदेचे (ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेनमेंट समिट-वेव्ज २०२५) आयोजन करण्याचा मान महाराष्ट्राला मिळाला आहे.

ही परिषद यंदा मुंबईत होणार असून या परिषदेसाठी अमेरिकेतील उद्योजक, गुंतवणूकदारांनी सहभागी व्हावे, असे निमंत्रण मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी दिले. जगाला भारताच्या मनोरंजन विश्वातील कला, सृजनशीलता आणि प्रतिभा दाखविण्याची ही सुवर्णसंधी असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

तत्पूर्वी यूएसआयबीसीचे अध्यक्ष राजदूत अतुल केशप, यूएस कन्सुल जनरल माइक हंकी, यूएस चेंबरच्या अध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी सुझेन क्लार्क यांनी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांचे स्वागत केले.


हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.

• संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल • मो. 7588166496 • Email : attalsanket2023@gmail.com • RNI No. MAHMAR/2023/87816

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. 7588166496 • Email : attalsanket2023@gmail.com • RNI No. MAHMAR/2023/87816